# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
**मुख्य कार्यालय** : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
अशोक नगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-६९०६७९००, ६९०६७९१८
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

झोपुप्रा/ तह-ताबा/६७८/२०२५
दिनांक:- ०८ /०७/२०२५

परिपत्रक क्र. १५ / २०२५

**विषय:-** झो.पु. प्राधिकरणाने संक्रमण शिबिरांकरीता भाडेतत्त्वावर उपलब्ध केलेल्या संक्रमण सदनिकांसंदर्भात दि. ३१ मार्च २०२५ अखेरची भाडे रक्कम आणि अनुषंगिक बाबीवरील खर्चाची प्रतिपूर्ती.

संदर्भ:-
१. झो.पु.प्राधिकरणाकडील कार्यालयीन परिपत्रक क्र. १०/२०२३, दि. १२ डिसेंबर २०२३.
२. झोपुप्रा कार्यालयामध्ये संक्रमण शिबीर वापरकर्त्या विकसकांसमवेत झालेली बैठक दिनांक २२/०४/२०२५.
३. झो.पु.प्राधिकरणाकडील कार्यालयीन परिपत्रक क्र.१४, दि. ०७/०७/२०२५.

संक्रमण शिबिरांच्या संदर्भातील वापर, भाडे रक्कम व आनुषंगीक खर्चाची प्रतिपूर्ती यासंदर्भातील झोपुप्राची उपरोक्त परिपत्रके अवलोकनात घ्यावीत. यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. झोपडपट्टी पुनर्वसन योजना क्षेत्रातील पात्र झोपडीधारकांसाठी संक्रमण काळातील तात्पुरती निवासी व्यवस्था म्हणून झोपुप्रा,पुणे अंतर्गत उपलब्ध असलेल्या सदनिका विकसकांना भाडेतत्त्वावर उपलब्ध करण्यात येतात. अशा प्रकरणी विकसकाने प्राधिकरणाकडे प्रत्येक तिमाहीचे भाडे व अनुषंगीक खर्च दर तिमाहीच्या १० तारखेपर्यंत आगाऊ स्वरूपात भरण्याबाबत आणि प्रलंबित रक्कमेवर SBI - Prime Landing Rate प्रमाणे चक्रवाढ व्याज लागू होईल असे झो.पु.प्रा. मार्फत संदर्भीय १ वरील परिपत्रकानुसार आदेशीत केले आहे. त्याचप्रमाणे यापूर्वी झो.पु.प्राधिकरणाने विकसकांना त्यांचे संदर्भातील दि. ३१/०३/२०२५ अखेरची थकबाकी दर्शविणारा तपशील कळवला आहे.

२. काही विकसकांनी संक्रमण शिबिरांसंदर्भात खालील बाबींवर त्यांचा खर्च झाल्याने त्यांच्याशी संबंधित प्रलंबित भाडे रक्कम व त्यावरील व्याज आकारणी कमी करावी अशी विनंती केली आहे.

   a) संक्रमण व्यवस्था वापरण्याजोगी होणेसाठी झोपुप्रा अधिकाऱ्यांच्या सल्लामसलतीने केलेला स्थापत्य/ विद्युत बाबींवरील खर्च.

b) झो.पु.प्रा. मार्फत उपलब्ध केलेली सुरक्षा व्यवस्था झोपुप्राच्या रिक्त सदनिकांसाठी असल्याने त्याबाबतचा विकसकांवर आकारणी केलेला खर्च.

c) संक्रमण शिबिरातील सदनिका विकसकांनी ताब्यात घेतली नसताना अशा कालावधीसाठी आकारलेली भाडे रक्कम.

d) "स्वच्छ" संस्थेची सेवा अनिवार्य केली नसताना त्यापोटी पुरवलेल्या सेवेसंदर्भातील देयक रक्कम.

e) उपरोक्त रक्कमेवर व्याजापोटी केलेली आकारणी.

३. जे विकसक संक्रमण शिबिरासंदर्भातील दि. ३१.०३.२०२५ रोजीची थकबाकी दि. ३१.०७.२०२५ पर्यंत जमा करतील त्या विकसकांना, त्यांनी उपरोक्त परि. B मध्ये दावा केलेल्या रकमेबाबत झो.पु.प्राधिकरणाने पडताळणीअंती मान्य केलेली रक्कम अशी रक्कम आणि त्यावरील व्याज पुढील त्रैमासिक देय भाडे रक्कमेतून समायोजित करून देण्यात येईल. सदर प्रकरणी मूळ भाडे रक्कमेमध्ये कोणतीही सवलत दिलेली नाही याची नोंद घ्यावी.

४. संक्रमण शिबिराच्या संदर्भात दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरची प्रलंबित रक्कम आणि दि. ०१/०४/२०२५ ते ३०/०६/२०२५ या कालावधीची त्रैमासिक भाडे रक्कम व आनुषंगीक खर्चाची प्रतिपूर्ती याबाबतचा तपशिल सोबतच्या पत्रकाप्रमाणे संलग्न केला आहे.

५. सदर प्रकरणी लागू केलेल्या व्याजातील सवलतीचा लाभ दि. ३१ मार्च २०२५ अखेरची थकबाकी दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत भरणा करतील अशाच विकसकांना लागू राहील. जे विकसक सदर योजनेचा लाभ दिनांक ३१/०७/२०२५ पर्यंत घेणार नाहीत, त्यांचे संदर्भात उपरोक्त परि. B मध्ये नमूद केलेल्या व झो.पु. प्राधिकरणामार्फत मान्य केलेल्या रक्कमेवरील व्याज भरणा करणे आवश्यक राहील.

झोपुप्राच्या संक्रमण शिबीरांचे भाडे व अनुषंगीक खर्च याबाबतची रक्कम वापरकर्त्या विकसकांनी वेळच्या वेळी भरणा करावी व त्यामध्ये कसूर झाल्यास अशा विकसकांबाबत झोपुप्रा मार्फत आवश्यक त्या उपाययोजना आखण्यात येतील याची नोंद घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
7.7.2025